| MHKO160002802023 | **<u>रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ३९/२०२३ मधील निशाणी क्रमांक २५ वर आदेश</u>** |
| --- | --- |

**०१.** प्रतिवादीने हा अर्ज बॉम्बे स्टँम्प ॲक्टचे कलम ४० प्रमाणे दस्त इम्पांऊंड करण्यासाठी दिला आहे.

**०२.** सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरूध्द कायम मनाईसाठी, कब्जासाठी व आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादीचे कथन आहे की मौजे येलूर पैकी जाधववाडी येथे कोल्हापूर रत्नागिरी रस्त्यास लागून असलेली व प्रतिवादी यांच्या घराशेजारील खुली पडसर जागा ज्याचा मिळकत क्र.३६८ क्षेत्र २० आर. असून सदर जमिनीमध्ये कोल्हापूर रस्त्याच्या मध्यापासून पश्चिमेस ६० फूट अंतर सोडून प्रतिवादीच्या घरास लागून खुली पडसर जागा ज्याची पूर्व पश्चिम लांबी ३३ फूट व दक्षिणोत्तर रूंदी १६ फूट ६ इंच एकूण क्षेत्र ०.०५ आर. ही प्रतिवादीने श्री. राजाराम पांडुरंग थोरवत यांचेकडून दि.२४/०३/२००० रोजी वीस रूपयाच्या स्टँपवर खरेदीकरार करून घेतलेली आहे. राजाराम पांडुरंग थोरवत यांना पैशाची गरज असल्याने कराराच्या महिन्यापूर्वी त्यांना योग्य ती रक्कम रू.२०,०००/- प्रतिवादीने दिलेली आहे. त्यानंतर राजाराम थोरवत यांनी चतु:सीमेअंतर्गत सदर मिळकत प्रतिवादीच्या ताब्यात दिलेली आहे. सदर खरेदीपत्राच्या दस्तावर मुद्रांक भरण्याच्या कारणास्तव सदरचा दस्त मा. मुद्रांक जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेमार्फत इंपाउंड करणेसाठी सदरचा दस्त मा. मुद्रांक जिल्हाधिकारीसाो, मध्यवर्ती शासकीय कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापुर यांचेकडे पाठविणेत यावा या मागणीसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे व तो मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०३.** वादीने या अर्जास नि.२६ वर म्हणणे सादर केले असून कथन केले की, असे कथन केले आहे की गट क्र.३६८ याचेशी वादीचा कोणताही हक्कसंबंध नाही. तसेच सदरच्या करारपत्रास वादी हे पक्षकार नसल्याने सदर गट क्र.३६८ चे मूळ मालक राजाराम थोरवत यांच्याशी कोणताही हक्कसंबंध नसल्याने दि.२४/०३/२००० रोजीचे करारपत्र वादी यांना करून दिलेले नाही. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकत गट क्र.३६९ शी संबंधित

असल्याने प्रस्तुत दस्त इंपाउंड करण्याची कोणतीही आवश्यकता नसून सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

**०४.** वादी, प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले, माझ्या विचारार्थी खालील मुददे निघतात. त्यावरील माझा निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करत आहे.

| अ. क्रं. | विचारार्थ निघालेले मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. ४ यांनी हजर केलेला दि. २४/०३/२००० चा दस्त इम्पाऊंड करावा का ? | होकारार्थी. |
| २ | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणेमिमांसा

## मुददा क्रमांक १ करीता

**०५.** बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट, १९५८ चे कलम ३४ प्रमाणे अपु-या स्टँम्पवर नोंदविलेला दस्त पुराव्यात वाचता येत नाही. बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट, १९५८ चे कलम ३३ अन्वये अपुरा स्टॅम्प जोडलेला दस्ता सरकारी कर्मचा-यांपुढे पुराव्यात वाचण्यासाठी आला तर सदरचा दस्त इम्पांउंड करुन घेण्याची जबाबदारी त्या अधिका-यांवर आहे. प्रतिवादीने सदरचा मुळ दस्त या कामी हजर केलेला आहे. सदरचा दस्त इम्पाउंड करण्यासाठी लागणारा सर्व खर्च प्रतिवादी करण्यास तयार आहेत. सदरचा दस्त खरा किंवा खोटा, सदरचा दस्त वादीने करुन दिला होता किंवा नाही हे पुराव्याअंती ठरवता येईल. तसेच प्रस्तुत दावा गट क्र.३६९ शी संबंधित असून वादातीत दस्तामधील गट क्र.३६८ हा वादातीत गटाच्या जवळचा असल्याचे दिसून येते. सदर वादातीत दस्ताचा प्रस्तुत दाव्याशी संबंध आहे किंवा कसे या बाबीं पुराव्याअंती न्यायालयासमोर येणार आहेत. त्यामुळे सद्य स्थितीत जरी गट क्र.३६८ मधील मिळकत दावा मिळकत नसली तरी प्रस्तुतचा दस्त अभिलेखावर आल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील मुख्य वाद निकाली करण्यासाठी,

सदरचे दस्ताबाबतची वस्तुस्थिती अभिलेखावर येणे गरजेचे आहे, त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. निरनिराळे वाद टाळण्यासाठी एकाच दाव्यात दोन्ही पक्षकारांचे सर्व वादमुद्दे निकाली काढणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचेमधील मुख्य वाद मिटविण्यासाठी सदरचा दस्त पुराव्यात वाचता येणे गरजेचे आहे व त्याकरीता सदरचा दस्त इम्पाउंड करणे न्यायोचित होईल. म्हणून मी मुददा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देत आहे व मुददा क्रमांक २ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** अर्ज नि.२५ मंजूर करण्यात येतो.

**०२.** प्रतिवादी क्र. ४ ने हजर केलेला दि. २४/०३/२००० रोजीचा दस्त इम्पांउंड करण्यासाठी मा. मुद्रांक जिल्हाधिकारी, मध्यवर्ती शासकीय कार्यालय, कसबा बावडा, कोल्हापूर यांच्याकडे पाठविण्यात यावेत.

**०३.** मुळ दस्ताची न्यायालयाच्या अधीक्षकांकडून तपासणी करुन साक्षांकित प्रत अभिलेखावर ठेवण्यात यावी.

**०४.** सदरचा दस्त इम्पांउंड करण्याचा खर्च प्रतिवादी क्र. ४ ने करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Pankaj Bhimrao Pawar

**( पी. बी. पवार )**

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**मलकापूर-शाहुवाडी**

**दिनांक – १८/०९/२०२५**